महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग,
पहिला मजला, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

☎- ०२२ २२०४ ७१५६ Email- usdesk१२.tdd@gov.in

क्र:-शिष्यवृ-१५२४/प्र.क्र.९८/का.१२ दिनांक- ०७ जानेवारी, २०२५

प्रति,

१) आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक
२) अपर आयुक्त, आदिवासी विकास (सर्व)
३) प्रकल्प अधिकारी,ए.आ.वि.प्र. (सर्व)

**विषय :- अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील शिष्यवृत्ती/फ्रिशीप योजनेंतर्गत प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून ऑफलाईन शिष्यवृत्ती अर्ज शासनास सादर करण्याची दक्षता संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी घेण्यात यावी.

१) ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीकरिता अर्ज करताना आधार नोंदणी न केल्याने महाडिबीटी प्रणालीवर अर्ज नामंजूर (Auto Reject) झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना त्यांचे आधार प्रमाणपत्र सादर करुन ऑफलाईन अर्ज करता येईल.

२) ज्या विद्याध्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केला होता परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे महाडिबीटी प्रणालीवर महाडीबीटी एडमीन कडून अर्ज नामंजूर (Reject) झाले आहेत (उदा. Application is expired in the system since no action was taken) अशा विद्यार्थ्यांना ऑफलाईन अर्ज सादर करता येईल, तथापि, कोणत्या कारणांमुळे ऑनलाईन अर्ज रिजेक्ट झाला त्याची कारणमीमांसा (याकरिता आवश्यकता असल्यास पोर्टलवरील दर्शविण्यात आलेल्या अर्ज स्थितीच्या स्क्रिनशॉटसह व त्याबाबतच्या पूर्ततेसह ऑफलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील.)

३) सदर ऑफलाईन अर्ज सादर करताना महाडिबीटी प्रणालीवरील नामंजूर झालेल्या अर्जाचा क्रमांक (Application ID) नमूद करणे आवश्यक आहे. सदर Application ID नमूद नसेल अशा अर्जाचा शिष्यवृत्ती मंजूरीकरिता विचार करण्यात येणार नाही.

४) ज्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन फॉर्म शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निकषांमध्ये बसत नसल्यामुळे (उदा. उत्पन्न मर्यादा, जात पडताळणी प्रमाणपत्र इ.) महाविद्यालय स्तरावरुन अथवा संबंधित प्रकल्प अधिकारी स्तरावरुन नामंजूर (Reject) झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना ऑफलाईन अर्ज सादर करता येणार नाहीत.

५) जे विद्यार्थी काही विशिष्ट कारणामुळे (विशिष्ट शैक्षणिक वर्षाकरिता महाविद्यालयाकडील शुल्क निश्चिती वेळेवर न झाल्याने व विद्याथ्यांचे नियमित तसेच पुरवणी परीक्षाचे निकाल विहित वेळेत न लागल्यामुळे व इतर..) महाडिबीटी प्रणालीवर अर्ज भरू शकले नाहीत अथवा अर्जाची नोंदणी करुनही ज्यांचे अर्ज मंजूर होऊ शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना कारणमीमांसासह ऑफलाईन अर्ज सादर करता येतील. तथापि, सदर प्रकरणी विद्यार्थ्यांनी नमूद केलेली कारणमीमांसा समर्पक असल्यासच शिष्यवृत्ती देय ठरणार आहे व याबाबतचा अंतिम निर्णय शासनाचा असणार आहे.

६) सदर ऑफलाईन अर्ज सादर करताना महाडिबीटी प्रणालीवर लागू असलेले सर्व निकष संबंधित विद्यार्थ्यांना लागू राहतील त्याचप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे नोंदविणे आवश्यक राहील. (उदा. उत्पन्न मर्यादा, जात पडताळणी प्रमाणपत्र, कॅप राऊंड प्रमाणपत्र इ.)

७) ज्या अभ्यासक्रमाचे मॅपिंग त्या त्या शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती/फ्रिशिपसाठी महाडिबीटी प्रणालीवर करण्यात आले आहेत, असेच अभ्यासक्रम शिष्यवृत्ती / फ्रिशीपचे ऑफलाईन अर्जाकरिता लागू राहतील. महाडिबोटी प्रणालीवर त्या त्या शैक्षणिक वर्षात मॅपिंग न झालेल्या अभ्यासक्रमाची शिष्यवृत्ती/फ्रिशिपच्या ऑफलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

८) एकाच विद्यार्थ्यांचे ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज सादर होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी तसेच याप्रकरणी ऑनलाईन अर्ज भरताना स्वतःचे प्रतिज्ञापत्र संबंधित विद्यार्थ्यांने द्यावे. सदर प्रकरणी दोन्ही प्रकारात विद्यार्थ्यांने अर्ज सादर केलेला असल्याची बाब निष्पण्ण झाल्यास संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्यात येईल.

९) सन २०१८-१९ ते २०२३-२४ या वर्षात ज्या विद्याथ्यांना महाडिबीटी प्रणालीवर नोंदणीकृत अर्जाची मंजुरी करण्यास अडचणी आल्या आहेत, अशा विद्याथ्यांनी ऑफलाईन अर्ज सादर करुन त्यांना शिष्यवृत्ती देण्यामागे केवळ होतकरु व गुणवंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये असा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे उपरोक्तप्रमाणे विद्याथ्यांनी महाविद्यालयामार्फत संबंधित प्रकल्प अधिकारी यांचेकडे शिष्यवृत्ती / फ्रिशिप करिता ऑफलाईन अर्ज सादर करण्याची मुदत दि.३१.०१.२०२५ पर्यंत असेल.

१०) दि.३१.०१.२०२५ नंतर येणाऱ्या कोणत्याही अर्जाना शासनाकडून मंजूरी देण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

११) संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी अर्जाची तपासणी करुन आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव शासनास सादर करण्याची मुदत दि. २८.०२.२०२५ पर्यंत असेल.

१२) ऑफलाईन मान्यतेकरिता प्राप्त होणाऱ्या अर्जांचे प्रकरणी ऑनलाईन शिष्यवृत्ती/फ्रिशिप देण्यात आलेली नाही याची खातरजमा संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी करुन घेणे आवश्यक राहील. शिष्यवृत्ती /फ्रिशिप दुबार अदा करण्यात आल्याचे निदर्शनास

आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच संबंधित प्रकल्प अधिकारी यांची राहील.

१३) अश्या प्रकारे विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणाऱ्या सन २०१८-१९ ते २०२३-२४ या वर्षातील शिष्यवृत्तीचे ऑफलाईन अर्जाची छाननी करून संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी सदरचे अर्ज विहित अटी व शर्तीच्या पुर्ततेसह दि.२८.०२.२०२५ पर्यंत शासनाच्या वित्त विभागाने विहीत केलेल्या अन्वेषण प्रक्रियेचा अवलंब करुन शासन मान्यतेकरिता सादर करण्याची दक्षता घ्यावी. सदर माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रांमध्ये शासनास सादर करावी.

आपला,

LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=77ee43feb646b7ae43865425ca1d67a75cd7607faeae62a4e9bad488155d6d28, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2025.01.07 12:15:47 +05'30'

**( ललितकुमार धायगुडे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

परिशिष्ट-अ

| आयुक्त यांनी अन्वेषण प्रस्तावासोबत द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना | | |
|---|---|---|
| अन्वेषण प्रमाणपत्रासाठी आवश्यक बाबी | आहे किंवा नाही. | पृष्ठ क्रमांक |
| १.आयुक्त कार्यालयाचे अन्वेषण प्रमाणपत्र मिळणे बाबतचे शिफारस पत्र | | |
| २.प्रकल्प कार्यालयाचे अन्वेषण प्रमाणपत्र मिळणे बाबतचे शिफारस पत्र | | |
| ३.नमुना क्र. ४०- प्रकल्प अधिकारी व आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. | | |
| ४. प्रमाणपत्रातील आवश्यक बाबी :-<br>A) प्रमाणपत्रामध्ये ज्या योजनेची प्रलंबित देयके आहेत त्या योजनेचे नाव, लेखाशिर्ष तसेच रक्कमेचा समावेश असावा.<br>B) प्रस्तावातील देयके दुबार नसल्याबाबतची खात्री करून तसा उल्लेख करावा.<br>C) विशेष चौकशी पथकाने केलेल्या चौकशी संबंधित सदरहू प्रस्तावातील नमूद महाविद्यालयांचा समावेश आहे किंवा कसे याबाबत स्पष्ट अभिप्राय द्यावेत.<br>D) प्रमाणपत्रामध्ये प्रकल्प अधिकारी व आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. | | |
| ५. प्रस्तावित रक्कमेचे देयके व देयकामधील MTR, College wise Summary, Student Pay Order जोडणे आवश्यक आहे. | | |
| ६. न्यायालयीन प्रकरण असेल तर त्या सबंधित आवश्यक बाबी. | | |
| ७. महाविद्यालयाचे हमीपत्र (रु.५०० च्या स्टँप पेपर वर) | | |
| ८. अर्ज प्रलंबित असलयाचे सविस्तर कारणे महाविद्यालयांनी सादर करावीत. व त्यावर संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी अभिप्राय द्यावेत. | | |
| ९. सदरील अन्वेषण प्रस्ताव आयुक्तालयास पृष्ठांकित करुन ई ऑफीस प्रणालीमध्ये सादर करण्यात यावा. | | |

अनु. जमाती प्रवर्गातील प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती/फ्रीशीप अन्वेषण प्रस्तवाची माहिती

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव, पत्र क्र. व दि. | देयक क्रमांक व दिनांक | योजनेचे नांव व लेखाशीर्ष | शैक्षणिक वर्ष (वर्ष निहाय) | महा विद्यालयाचे नांव व महा डीबीटी वरील युजर आय डी | विद्यार्थी संख्या | विद्यार्थी रक्कम | महा विद्यालय रक्कम | एकुण रक्कम | प्रलंबित राहण्याची कारणे मिमांसा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

उपरोक्त अनु. जमाती प्रवर्गातील प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती / फ्रिशीप योजनेंतर्गत अन्वेषण प्रमाणपत्र मिळणे बाबतचा प्रस्ताव परिशिष्ट अ च्या विहित अटी व शर्तीप्रमाणे पडताळणी करून योग्य असल्याची खात्री करण्यात आलेली आहे. त्यानुसार, सदरचा प्रस्ताव आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील उपलब्ध तरतूदी मधून निकाली काढण्याकरिता मंजुरीस शिफारस करण्यात येत आहे.

स्थळ:- -----------

दिनांक :- -----------

आयुक्त, आदिवासी विकास,

नाशिक -------

(नांव, पदनाम व शिक्का)

परिशिष्ट ब

प्रकल्प अधिकारी यांनी द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना

प्रमाणित करण्यात येते कि, प्रस्तावातील देयक रक्कम रु... आम्ही खात्री करून प्रस्तावित करीत आहोत. बाबत खालील प्रमाणे मी /

प्रस्तावात नमूद केलेल्या महाविद्यालयाकडून सन २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील महाविद्यालयातील प्रवेशित अनुसूचित प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे ------या योजनेचे प्रलंबित अर्जाचा प्रस्ताव खालील तपशिलाप्रमाणे या कार्यालयास मंजुरी करिता सादर करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | देयक क्रमांक व दिनांक | योजनेचे नांव व लेखा शीर्ष | शैक्षणिक वर्ष (वर्ष निहाय) | महाविद्यालयाचे नांव व महाडीबीटी वरील युजर आय डी क्र. व दि. | डीबीटी पोर्टल वरील नोंदणी कृत अर्ज क्रं (ऑटो रिजेक्ट झालेल्या अर्जां करीता) किंवा ऑफलाईन अर्जां करता मॅन्युअर अर्ज क्रमांक | विद्यार्थ्यांचे नांव | सद्यस्थितीत विद्यार्थ्यांस देय रक्कम | | | महाविद्यालय रक्कम | एकुण रक्कम | प्रलंबित असल्याची सविस्तर कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | निर्वाह भत्ता | या अगोदर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास भरणा केलेले शुल्क | एकुण | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |

i) वरील अनु.जमाती प्रवर्गातील प्रलंबित अर्ज हे महाडीबीटी प्रणालीवर नोंदणीकृत आहेत. परंतु वरील अडचणीमुळे सदर अर्जावरील मंजुरीची पुढील कार्यवाही होऊ शकली नाही. ऑटो रिजेक्ट झालेल्या अर्जाकरिता सन २०१८-१९ ते २०२३-२४ मधील महाडीबीटी पोर्टलनुसार नोंदणीकृत आहेत याची खात्री ऑनलाईन अर्ज क्रमांकावरून व अर्जाच्या प्रिंट वरून केलेली आहे.

ii) वरील प्रलंबित असलेल्या अनु. जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी दिलेली सर्व माहिती, त्याच्या कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे त्या त्या वर्षाचे सक्षम प्राधिकारी यांचे उत्पन्न प्रमाणपत्र, तो शिकत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती, शैक्षणिक माहिती, त्याचे वसतिगृह, वसतिगृहा बाहेर राहण्याची माहिती, शुल्करचना, जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, गुणपत्रक शासकीय कोट्यातील प्रवेशपत्र (कॅप प्रमाणपत्र) इ. कागदपत्रांचे मुळप्रती पूर्णपणे तपासून ते बरोबर असल्याची खात्री महाविद्यालयाने केलेली असून त्यांच्या प्रस्तावातील प्रलंबित असलेले विद्यार्थी हे खातरजमा केलेली आहे. या योजनेस पात्र असल्याचे या कार्यालयाने खात्री केलेली आहे.

iii) वरील अनु.जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित प्रस्तावाची -या योजनेची रक्कम याअगोदर महाविद्यालयास व विद्यार्थ्यास मंजूर होऊन प्राप्त झालेली नाही याची पडताळणी करून या कार्यालयाने खात्री केलेली आहे.

IV) प्रस्तावातील नमूद केलेल्या महाविद्यालयाची विशेष चौकशी पथकामार्फत चौकशी सुरु नाही वा प्रलंबित नाही, तसेच वसुली प्रलंबित नाही मात्र भविष्यात महाविद्यालयाकडे वसुली निघाल्यास वसूलपात्र रक्कम व्याजासह या कार्यालयाद्वारे महाविद्यालयाकडून वसुली करण्यात येईल.

VI) वरील प्रस्तावात नमूद केलेले प्रलंबित अनु. जमाती प्रवर्गातील विद्यार्थी हे संबंधित महाविद्यालयामधील नियमित विद्यार्थी आहेत. त्यांनी कोणत्याही अन्य महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेला नाही, तसेच शासननिर्णयानुसार त्यांची महाविद्यालयातील उपस्थिती ७५% पेक्षा अधिक असल्याचे महाविद्यालयाने प्रमाणित केले असून याबाबत्त या कार्यालयाने खात्री केलेली आहे.

VI) वरील प्रस्तावात नमूद केलेले महाविद्यालय हे शासन मान्यता प्राप्त आहे, ते अनुदानित / विनाअनुदानित आहे, महाविद्यालयातील मान्य झालेले अभ्यासक्रम हे संबंधित सक्षम प्राधिका-यांनी मान्यता दिलेले आहेत, प्रत्येक अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ही मान्यता दिल्यानुसारच आहे व त्या प्रवेश क्षमतेच्या अधिन राहून अनु. जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रलंबित अर्ज या कार्यालयाकडे मंजुरीसाठी फॉरवर्ड केले आहेत, त्यांची शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क व इतर शुल्क संबंधित सक्षम प्राधिकारी / विद्यापीठ यांनी मान्य केलेली आहे. तसेच प्रस्तावातील विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क महाविद्यालयाकडून वसूल करण्यात आलेले नसल्याचे महाविद्यालयाने प्रमाणित केलेली असून त्याची खात्री या कार्यालयाने केलेली आहे.

VII) सदर प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या महाविद्यालयातील अनु. जमाती प्रवर्गातील प्रलंबित अर्जाव्यतिरिक्त कोणतेही अर्ज प्रलंबित नाहीत. भविष्यात सन २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे प्रस्तावात नमूद केलेल्या महाविद्यालयाचे अर्ज प्रलंबित नसल्याचे सदर महाविद्यालयांनी प्रमाणित केलेली असून त्याची खातरजमा या कार्यालयाने केलेली आहे.

VIII) सदरील प्रलंबित रक्कम महाविद्यालयास प्राप्त होऊन महाविद्यालयांकडून या कार्यालयास उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त होताच त्याची प्रत आयुक्तालयास १५ दिवसात या कार्यालयामार्फत सादर करण्यात येईल.

स्थळ:-
दिनांक:

प्रकल्प अधिकारी
(नाव, पदनाम व शिक्का)

आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक
- - - - - - - - -
(नाव, पदनाम व शिक्का)

टीप:- योजनानिहाय स्वतंत्र प्रमाणपत्र सादर करावे.

## परिशिष्ट क

महाविद्यालयाने द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना (रु.५०० च्या स्टॅम्प पेपर वर नोटरीकरुन) प्रमाणित करण्यात येते कि, सन २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील महाविद्यालयातील प्रवेशित अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे --------------------------------------------या योजनेचे प्रलंबित अर्जाचा प्रस्ताव खालील तपशिलाप्रमाणे प्रकल्प अधिकारी -------------यांच्याकडे मंजुरी करिता सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | योजनेचे नांव व लेखाशीर्ष | शैक्षणिक वर्ष (वर्ष निहाय) | महाविद्यालयाचे नांव व महा डीबीटी वरील युजर आय डी पत्र क्र. व दि. | डीबीटी पोर्टलवरील नोंदणीकृत अर्ज क्रमांक (ऑटो रिजेक्ट झालेल्या अर्जांकरीता) किंवा ऑफलाईन अर्जा करता मॅन्युअर अर्ज क्रमांक | विद्यार्थ्यांचे नांव | सद्यस्थितीत विद्यार्थ्यांस देय रक्कम | | | महाविद्यालय रक्कम | एकुण रक्कम | प्रलंबित असल्याची सविस्तर कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | निर्वाह भत्ता | या अगोदर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास भरणा केलेले शुल्क | एकुण | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |

i. वरील अनु.जमाती प्रवर्गातील प्रलंबित अर्ज हे महाडीबीटी प्रणालीवर नोंदणीकृत आहेत. परंतु वरील अडचणीमुळे सदर अर्जावरील मंजुरीची पुढील कार्यवाही होऊ शकली नाही. महाडीबीटी प्रणालीवर नोंदणीकृत आहेत याची खात्री ऑनलाईन अर्ज क्रमांकावरून व अर्जाच्या प्रिंट वरून केलेली आहे.

ii. वरील प्रलंबित असलेल्या अनु. जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी दिलेली सर्व माहिती, त्याच्या कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे त्या त्या वर्षाचे सक्षम प्राधिकारी यांचे दिलेले वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र, तो शिकत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती, शैक्षणिक माहिती, त्याचे वसतिगृह, वसतिगृहा बाहेर राहण्याची माहिती, शुल्करचना, जातीचे प्रमाणपत्र, उत्त्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता जात वैधता प्रमाणपत्र, गुणपत्रक शासकीय कोट्यातील प्रवेशपत्र

इ. कागदपत्रांचे मुळप्रती पूर्णपणे तपासून ते बरोबर असल्याची खात्री केली आहे. तसेच प्रस्तावातील नमूद प्रलंबित असलेले विद्यार्थी हे पात्र आहेत.

iii. वरील अनु.जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित प्रस्तावाची -या योजनेची रक्कम याअगोदर महाविद्यालयास व विद्यार्थ्यास मंजूर होऊन प्राप्त झालेली नाही याची. पडताळणी करून खात्री केली आहे.

IV) महाविद्यालयाने या अगोदर शिष्यवृत्ती / फ्रिशीप योजनेकरिताची महाविद्यालयास देय असलेली उपरोक्त रक्कम संबंधित विद्यार्थ्यांकडून आकारण्यात आलेली नाही.

V) आमचे महाविद्यालयाची विशेष चौकशी पथकामार्फत चौकशी सुरु नाही वा प्रलंबित नाही, तसेच वसुली प्रलंबित नाही मात्र भविष्यात महाविद्यालयाकडे वसुली निघाल्यास वसूलपात्र रक्कम व्याजासह परत करण्यात येईल.

VI) निम्नस्वाक्षरीत प्रमाणित करतो की, वरील प्रलंबित अनु. जमाती प्रवर्गातील विद्यार्थी हे आमच्या महाविद्यालयामधील नियमित विद्यार्थी आहेत. त्यांनी कोणत्याही अन्य महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेला नाही, तसेच शासननिर्णयानुसार त्यांची महाविद्यालयातील उपस्थिती ७५% पेक्षा अधिक आहे.

VII) तसेच सदर अनु. जमाती प्रवर्गातील प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्तीचे प्रस्ताव न्यायालयीन प्रकरण आहे / नाही असेल तर त्याबाबतचे कागदपत्रे सोबत जोडली आहेत.

VIII) आमचे महाविद्यालय हे शासन मान्यता प्राप्त आहे, ते अनुदानित/ विनाअनुदानित आहे, महाविद्यालयातील मान्य झालेले अभ्यासक्रम हे संबंधित सक्षम प्राधिका-यांनी मान्यता दिलेले आहेत, प्रत्येक अभ्यासक्रमावी प्रवेश क्षमता ही मान्यता दिल्यानुसारच आहे व त्या प्रवेश क्षमतेच्या अधिन राहून अनु. जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रलंबित अर्ज प्रकल्प अधिकारी यांचे कडे मंजुरीसाठी फॉरवर्ड केले आहेत, त्यांची शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क व इतर शुल्क संबंधित सक्षम प्राधिकारी / विद्यापीठ यांनी मान्य केल्याप्रमाणेच असून ती अवास्तव किंवा अवाजवी नाही. शासन / विद्यापीठ / सक्षम प्राधिकारी याचे प्रचलित नियम व अटी यांचे पालन करुन व त्यामधील नियम, अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यार्थ्यांचा अर्ज योग्य व नियमानुसार असून, त्याची शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्काची देय रक्कम, संबंधितांचे आधार संलग्न बँक खात्यावर जमा होणेसाठी शिफारस करण्यात येत आहे. तसेच प्रस्तावातील विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क महाविद्यालयाकडून वसूल करण्यात आलेली नाही. यामध्ये भविष्यात अनियमीतता उणीवा व गैरप्रकार झाल्यास त्याची सर्व जबाबदारी प्राचार्य म्हणून माझी असून शासन निर्णयानुसार मी फौजदारी स्वरूपाच्या गुन्हयास पात्र राहीन.

IX) तसेच आमच्या महाविद्यालयातील वरील अनु. जमाती प्रवर्गातील प्रलंबित अर्जाव्यतिरिक्त कोणतेही अर्ज प्रलंबित नाहीत. सन २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालय स्तरावर अर्ज प्रलंबित राहून, विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाचे प्राचार्य, संबंधित संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांचीच राहील व याबाबत आदिवासी विकास विभागाची जबाबदारी राहणार नाही.

मी श्री / श्रीमती (प्राचार्याचे नाव)- या संस्थेच्या या महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत आहे. त्या अधिकारात उपरोक्त अनु.जमाती प्रवर्गातील प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती मंजूर करण्याकरीता शिफारस करीत आहे. सदरील प्रमाणपत्रातील माहिती खोटी आढळल्यास याची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयाचे प्राचार्य यांची राहील व मी फौजदारी स्वरूपाच्या गुन्हयास पात्र राहीन. तसेच सदरील प्रलंबित रक्कम महाविद्यालयास प्राप्त होताच उपयोगिता प्रमाणपत्र १५ दिवसात प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयाकडे
सादर करण्यात येईल.

जावक क्रमांक: - - - - - - - - - - -

दिनांक: - - - - - - - - - - - - - - -

ठिकाण: - - - - - - - - - - - - - - -

प्राचार्याची स्वाक्षरी
नाव व पदनाम
महाविद्यालयाचा शिक्का

टीप:- योजनानिहाय स्वतंत्र प्रमाणपत्र सादर करावे.

नमुना

म. को. नि. १५१

| | | |
|---|---|---|
| १ | मागणीदाराचे नाव | |
| २ | मागणीचे स्वरुप (ज्यातुन मागणी उदभवली ती परिस्थिती तपशिलात दिली पाहिजे) | |
| ३ | मागणीचा तपशिल (अ)कालावधी (ब)दरमहा दर आणि (क) देय रक्कम | |
| ४ | मागणी चुकती करण्यात आलेल्या विलंबाची कारणे (निरनिराळ्या टप्प्यावर झालेला विलंब नमूद केला पाहिजे ) | |
| ५ | मागणी चुकती करण्यात आलेल्या विलंबाची कारणे (निरनिराळ्या टप्प्यावर झालेला विलंब नमूद केला पाहिजे ) | |
| ६ | मागणीचे प्रदान न केल्यामुळे निवृत्तीवेतनावर परिणाम होईल का (३९ ब करीता लागू) | लागु आहे/लागु नाही |

प्रकल्प अधिकारी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

# प्रमाणपत्र

वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १७/०४/२०१५ तील भाग पहिला उपविभाग -१ अनु. क्र ६ नियम क्र. ४० चे अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की, महाविद्यालयाचे नाव व पत्ता या महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांचे नाव/ एकूण विद्यार्थी संख्या यांचे दि. ते दि. (शैक्षणिक वर्ष) या कालावधीची रक्कम रु. ....... (अक्षरी रक्कम) भारत सरकार पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशिप/ फ्रीशीप ची रक्कम यापूर्वी कोषागारातून आहंरीत करण्यात आलेली नसून सदर रक्कम महाविद्यालयाचे नाव/विद्यार्थ्यांचे नाव यांना अदायगी करण्यात आलेली नाही. याबाबतची खात्री करण्यात आलेली आहे.

ठिकाण-

दिनांक-

प्रकल्प अधिकारी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प